I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** जोडभावीपे **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0794 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/11/2025 01:02 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 25/11/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 26/11/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:45 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:54 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 27/11/2025 **Time (वेळ):** 00:15 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 27/11/2025 01:02 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तालुका कषी अधिकारी, उत्तर सोल, येथील त्यांचे कार्यालयात,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्‌दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलेश चंद्रकांत पवार

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर , जोडभावीपे, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , सोलापूर , जोडभावीपे, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9657917317

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | धनंजय सुभाष शेटे | | | 1. गौरी गणेश नगर,भाजी मंडई जवळ,श्री गुंड यांचे घरी भाडयाने,Town/Village (शहर / गाव): बाळे,ता उत्तर सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): जोडभावीपे,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद तारीख 27/11/2025

मी. श्री. शैलेश चंद्रकांत पवार, वय - 41 वर्षे व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9657917317.

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे सन जून / 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 25/11/2025 रोजी 10:15 वा. आम्ही व श्री. प्रशांत चौगुले पोलीस उपअधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर असे कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री. सुजित लक्ष्मण माळी, वय 30 वर्षे, व्यवसाय-शिक्षण व शेती रा.ठि.- मु.पो. दारफळ गावडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर हे अॅन्टी करप्शन सोलापूर कार्यालयात हजर झाले. त्यांनी त्याची लाच मागणीसंदर्भात तक्रार असल्याचे सांगितली. त्यावरून पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत चौगुले यांनी सदर तक्रारदार माळी यांचे तक्रारीवरून कारवाई करणेस आम्हास सांगितलेने लागलीच आम्ही आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत दोन शासकिय पंच उपलब्ध करून देणेबाबत मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांना पत्र दिले.

त्यानंतर दि. 25/11/2025 रोजी 12:45 वा. चे सुमारास पंच (1) श्री. राजीव पुनाजी बांबळे पद कनिष्ठ श्रेणी लिपीक, नेम. घनकचरा व्यवस्थापन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर रा. स्वप्नपुष्प, राजस्व नगर, पोतदार शाळेजवळ, सोलापूर व (2) श्री. यादव माधवराव डाके पद कनिष्ठ श्रेणी लिपीक, नेम. विभागीय कार्यालय क्र. 8, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर रा. निराळे वस्ती, अरविंदधाम पोलीस वसाहतीजवळ, सोलापूर हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर युनिट येथील कार्यालयातील आमचे दालनात आमचे समक्ष उपस्थित झाले.

त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर अशी सांगुन त्यानंतर आमचे दालनात उपस्थित असलेले तक्रारदार श्री. सुजित लक्ष्मण माळी व वर नमुद दोन्ही पंच यांची आपसात ओळख करुन दिली. त्यानंतर वर नमूद पंच साक्षीदार यांना आम्ही तक्रारदार श्री. सुजित लक्ष्मण माळी यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून पुढील कार्यवाही करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला. त्याप्रमाणे पंच क्र. 1 म्हणून श्री. राजीव पुनाजी बांबळे व पंच क्र. 2 म्हणून श्री. यादव माधवराव डाके असे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सुजित लक्ष्मण माळी, वय 30 वर्षे, व्यवसाय-शिक्षण व शेती रा.ठि.- मु.पो. दारफळ गावडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर असे असल्याचे सांगून, माझ्या वडील नामे लक्ष्मण जयराम माळी यांचे नांवे आपले सरकार पोर्टलवर महाराष्ट्र शासन कृषी विभाग महाडिबीटी पध्दतीव्दारे राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने मधून कृषी अवजारे साहित्य मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यावरुन लॉटरीपध्दतीने निवड झालेली होती. त्यानंतर साहित्य मिळण्यासाठी आवश्यक असणारे ऑनलाईन पध्दतीव्दारे पुर्वसंमती देणेकरीता श्री.  धनंजय शेटे , पद- तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय उत्तर सोलापूर हे 10000/- रू लाचेची मागणी करीत असलेबाबत थोडक्यात हकीकत सांगितली त्यानंतर त्यांना सदरची तक्रार त्यांचे स्व:हस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली ती पुढीलप्रमाणे.

“मी अर्जदार, उपरोक्त विषयास अनुसरुन तक्रारी अर्ज देत आहे की, मी सुजित लक्ष्मण माळी, व्यवसाय-शिक्षण व शेती रा.ठि- मु.पो. दारफळ गावडी, ता. उत्तर सोलापूर, जि.सोलापूर येथे शेती व्यवसाय करुन उदनिर्वाह करीत आहे. मौजे दारफळ, ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथे माझ्या

वडील नामे लक्ष्मण जयराम माळी यांचे नांवे गट नं - 431/4 मध्ये 01 हेक्टर 40 आर शेतजमीन असून, मी शेती कामासाठी महाराष्ट्र शासन कृषी विभागाकडुन मिळणा-या शेती कामासाठी मिळणारे कृषी अवजारे या साठी आपले सरकार पोर्टलव्दारे महा-डीबीटी पध्दतीव्दारे माझे वडील लक्ष्मण जयराम माळी यांचे नांवे दि. 26/06/2025 रोजी अर्ज क्रमांक 25262020000644303 असा केला होता. सदर योजनेमध्ये शेती कामाकरीता उपयोगी असणारे एकूण 15 शेती साहित्य मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्यापैकी राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने मधून माझ्या वडीलांचे नांव ट्रॅक्टर, मनुष्य चलित अवजारे व मिनीदाळ प्रक्रिया संच करीता लॉटरीव्दारे निवड झाली असल्याबाबतचा संदेश माझे मोबाईल क्रमांक 8007050157 वर दिनांक 10/10/2025 रोजी आला होता. त्यानंतर कृषी अवजारे घेण्यासाठी मी माझे वडीलांचे आवश्यक कागदपत्रे दि. 14/10/2025 रोजी ऑनलाईन पध्दतीव्दारे अपलोड केले होते. त्यानंतर सदरचे कृषी अवजारे मिळण्यासाठी असणारी पध्दत हि माझे वडील लाभार्थी निवड प्रक्रिया हि महाराष्ट्र शासनाचे कृषी विभागाची पुर्वसंमती टप्प्या पर्यत अर्ज सादर झालेला होता. त्यानंतर मी केलेल्या अर्जाचे सद्यस्थिती बाबत चौकशी करण्याकरीता तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांचे कार्यालयामध्ये दिनांक 20/11/2025 रोजी गेलो असता त्या ठिकाणी श्री. शेटे, पद-तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांना त्यांचे कक्षामध्ये भेटलो. त्यावेळी मी माझे वडीलांचे लॉटरीव्दारे निवड झालेल्या कृषी अवजारे मिळण्याबाबत चर्चा केली त्यावेळी त्यांनी मला कृषी अवजारे मिळण्यासाठी आवश्यक असणारी कार्यालयाकडील ऑनलाईनव्दारे पुर्व संमती देण्याकरीता त्याचेकडील कॅलक्युलेटरवर प्रथम आठ हजार टाईप करुन मला दाखवले त्यावेळी मी त्यांना हे काय आहे असे विचारले असता त्यांनी मला तु समजू शकतो तुला काही जास्त सांगायची गरज नाही असे म्हणाले त्यानंतर पुन्हा त्यांनी कॅलक्युलेटरवर दहा हजार टाईप करुन मला दाखविले त्यावेळी मी त्यांना माझ्या आता पैसे नाहीत मी पुन्हा येतो असे म्हणून त्यांचे कार्यालयातून बाहेर येवून माझ्या रहाते गावी गेलो. त्यानंतर मी माझ्या वडीलांना मिळणा-या कृषी अवजारे बाबत गावामध्ये चौकशी केली त्यावेळी मला समजले की, ऑनलाईन पुर्वसंमती देण्याकरीता पैशाची आवश्यकता लागत नाही. श्री. शेटे पद-तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर हे मला मागणी करत असलेल्या रक्कम हि कोणतीही शासकीय फी नसून ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. मला श्री. शेटे पद-तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांना महाराष्ट्र शासनाचे कृषी विभागाकडील शेतक-यांना कृषी अवजारे मिळण्यासाठी आवश्यक असणारी कार्यालयाकडील ऑनलाईनव्दारे पुर्व संमती देण्याकरीता 10,000/- रुपये लाच रक्कम देण्याची इच्छा नाही. त्यांनतर मी आज दि. 25/11/2025 रोजी श्री. शेटे पद-तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांना त्यांचे कार्यालयात जावून भेटणार आहे तरी आपले विभागाकडुन योग्य ती कारवाई करावी ही विनंती.

माझ्या तक्रारी अर्जासोबत आपले सरकार पोर्टलव्दारे केलेल्या अर्जाची प्रत व लॉटरीव्दारे निवड झालेल्या लाभार्थी साहित्य यादी कागदपत्रांची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

माझेत व श्री. शेटे पद-तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांचेत कोणताही अर्थिक व्यवहार नाही. तथा आमचेमध्ये सदर कामाचे व्यतीरिक्त कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. माझी वरील लाच मागणीची तक्रार माझे स्व:हस्ताक्षरात लिहून दिली. तरी श्री. शेटे पद-तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांचेवर योग्य कारवाई करावी ही विनंती." वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिली. नंतर सदरची तक्रार आम्ही व वर नमुद पंच साक्षीदार यांनी

वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार श्री. माळी हे दि. 25/11/2025 रोजी लोकसेवक शेटे यांचे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर येथे जावून त्यांचे वडील लक्ष्मण जयराम माळी यांचे नांवे आपले सरकार पोर्टलवर महाराष्ट्र शासन कृषी विभाग महाडिबीटी पध्दतीव्दारे राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने मधून कृषी अवजारे साहित्य मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यावरुन लॉटरीपध्दतीने निवड झालेली होती. त्यानंतर साहित्य मिळण्यासाठी आवश्यक असणारे ऑनलाईन पध्दतीव्दारे पुर्वसंमती मिळण्याचे अनुषंगाने चर्चा करणार असल्याने तक्रारदार श्री. माळी यांचे तक्रारीनुसार लोकसेवक शेटे यांचेवर लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याकरिता आम्ही, तक्रारदार श्री. माळी व दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हाईस रेकॉर्डर व पॅकिंग मधील 08 जीबी चे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगीतला. त्यानंतर आम्ही, तक्रारदार श्री. माळी यांचेकडे लोकसेवक शेटे हे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. पडताळणीसाठी पंच क्र. 1 म्हणुन श्री. राजीव पुनाजी बांबळे पंच क्र. 2 म्हणून श्री. यादव माधवराव डाके हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 बांबळे पंच क्र. 2 डाके यांचे निवेदन घेण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे पाकिटातून बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार श्री. माळी व त्यानंतर पंच क्र. 1 श्री. बांबळे पंच क्र. 02 श्री. डाके यांचे पडताळणी निवेदन घेतले ती वेळ 13:48 वा ची होती. सदरचे निवेदन घेताना त्याचे व्हीडीओ रेकॉर्डीग करणेत आलेले आहे. त्यानंतर तक्रारदार श्री. माळी यांना लोकसेवक शेटे यांचेकडे लाच मागणी पडताळणी कामी पाठवण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर 14.01वा चालू करून तो तक्रारदार श्री. माळी यांचे शर्टाच्या आत असलेले बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून व तक्रारदार यांना पंच क्र. 01 श्री. बांबळे यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांची ग्रे कलरची टाटा पंच चारचाकी गाडी नं. एम.एच. 12 व्ही. व्ही. 4442 मधून सोलापूर शहरातील तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर येथे रवाना केले.

त्यानंतर आम्ही व पंच क्र. 02 डाके असे लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 असे लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयात परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 15:30 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र. 2 श्री. डाके यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, “मी व तक्रारदार माळी असे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनातून सिव्हील चौक, कालिका मंदीर, जोड बसवण्णा चौक, दयानंद कॉलेज मार्गे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर येथे गेलो. तेथे चारचाकी वाहन पार्किंगमध्ये लावून मी व तक्रारदार माळी असे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर कार्यालयात गेलो असता आतमध्ये असलेले महिला कर्मचारी यांना सरांना भेटायचे आहे असे सांगितले असता त्यांनी जावा असे सांगितलेने तेव्हा आतमध्ये मॅडम

असलेने थांबून राहीलो त्या बाहेर आलेनंतर मी व तक्रारदार माळी असे श्री. शेटे बसतात त्या कॅबिनमध्ये गेलो. तेथे तक्रारदार माळी यांनी त्यांचे ऑनलाईन पुर्वसंमतीचे कामाचे अनुषंगाने विचारणा करित असताना श्री शेटे यांनी माझेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी ते मित्र असलेचे सांगितले. तेव्हा शेटे यांनी मला बसा बाहेर.. तुमच काय काम आहे का थोडसं म्हणून बाहेर बसावयास सांगितले. त्यामुळे मी केबीनचे बाहेर येवून दारातच ते दिसतील व त्यांचे बोलणे ऐकू येईल येवढया अंतरावर थांबून राहीलो. काही वेळाने श्री. शेटे हे बाहेर आले. व त्यांनी
व त्यांनी टाटा पंच गाडी तुमचीच आहे का असे मला विचारले असता मी त्यांना हो असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने ते पुन्हा आतमध्ये येवून त्यांच्या कॅबिनमध्ये गेले. मी तेथेच दाराजवळच थांबून होतो. तक्रारदार माळी व श्री शेटे यांचेत आतमध्ये त्यांचा कामाचे अनुषंगाने चर्चा करीत असताना श्री शेटे यांनी त्यांचे समोरचे कॅल्क्युलेटरवर काहीतरी टाईप करून तक्रारदार माळी यांना दाखविले. तेव्हा माळी यांनी दहा हजार जास्त होतेत असे सांगून तडजोड केली असता श्री. शेटे यांनी पुन्हा एकदा त्यांचे समोरील कॅल्क्युलेटरवर काहीतरी टाईप करून दाखविले होते. ते मी पाहिले आहे. तसेच तु जास्त वेळ बसु नको हिथ.. तसेच याबाबत बाहेर कोठे चर्चा करून नको असे सांगून श्री. शेटे यांनी तक्रारदार माळी यांचेकडे तडजोडीअंती 8000/- रू लाचेची मागणी केली. त्यानंतर माळी श्री. शेटे यांचे कॅबिनमधून बाहेर आले. व मला निघण्याबाबत हाताने इशारा केलेने मी ही त्यांचेपाठीमागे कार्यालयाचे बाहेर येवून मी व तक्रारदार माळी असे त्यांचेकडील चारचाकी वाहनामधून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथील कार्यालयात परत आलो असे सांगीतले.

त्यानंतर तक्रारदार माळी यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र. 01 बांबळे यांनी सांगितलेप्रमाणेच ते पंच 1 यांचेसह श्री. शेटे यांचे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर कार्यालयात गेलो असता आतमध्ये असलेले महिला कर्मचारी यांना सरांना भेटायचे आहे असे सांगितले असता त्यांनी जावा असे सांगितलेने तेव्हा आतमध्ये मॅडम असलेने थांबून राहीलो त्या बाहेर आलेनंतर मी व पंच बांबळे असे श्री. शेटे बसतात त्या कॅबिनमध्ये गेलो. तेथे मी नमस्कार साहेब असे म्हणून ते गुरुवारी देतो म्हटले सर परत ते दिलेच नाही…ते लक्ष्मण माळी असे म्हणून माझे ऑनलाईन पुर्वसंमतीचे कामाचे अनुषंगाने विचारणा करित असताना श्री शेटे यांनी माझे सोबत आलेले पंच यांचेबाबत विचारणा केली असता मी ते मित्र असलेचे सांगितले. तेव्हा शेटे यांनी पंच 1 यांना बसा बाहेर..तुमच काय काम आहे का थोडसं म्हणून बाहेर बसावयास सांगितले. त्यामुळे पंच 1 बांबळे हे केबीनचे बाहेर जावून दारातच आम्ही दिसू व आमचे बोलणे ऐकू येईल येवढया अंतरावर थांबून राहीले. त्यानंतर श्री. शेटे यांचेशी माझे कामाचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी मी ते आपल हे करा कि.. डन असे म्हणालो असता त्यावर शेटी यांनी काय करू डन असे म्हणाले त्यावर मी परवा सांगितलेल काय असे म्हणालो असता शेटे यांनी त्यात काय विषय हाय असे म्हणाले असता मी यांना काय तरी कमी करा थोडे फार ..काय असे म्हणालो तेव्हा शेटे यांनी असा जर दिला कागद तर वाचता येत नाही र..ही असे म्हणाले असता त्यावर मी म्हण् ुनच विचारल होय इथ काय कॅमेरा वगैरे नसल तर हयाची काय गरज पण नाही असे म्हणालो. तेव्हा शेटे यांनी करायच तर हे कर असे म्हणून कॅल्क्युलेटरवर 10000 असे नमुद करून 10,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर कामाचे अनुषंगाने इतर काही चर्चा केलेनंतर मी श्री. शेटे हे लाच रक्कमेत काहीतरी कमी करतील असे वाटल्याने काय..तर लिहा तेच्यावर…को-यावर काय

कळणाराय.. असे म्हणालो असता त्यांनी दिसतंय..का? केलत की एवढ.. असे म्हणून त्यांचेकडील कॅल्क्युलेटरवर पुन्हा 10000 टाईप करून दाखविले. तेव्हा मी दहा हजार जास्त होतय काय तर थोड..थोड कमी करा शेतक-याच...अस काय नाय तुमी एवढ म्हणत असाल तर..एवढ्याला पण काय ही नाय..पण थोड काय ॲडजस्टमेंट थोड फार....आठ हजार असे म्हणालो असता शेटे यांनी पुन्हा कॅल्क्युलेटरवर 8000 असे नमुद करुन मान हालवून 8,000/- रू. लाच रक्कमेस संमती दिली तसेच तु जास्त वेळ बसु नको हिथ.. व बाहेर चर्चा करत बसु नको ऊग.. असे सांगितले. त्या दरम्यान त्यांनी माझा मोबाईल घेवून त्यावर त्यांचा मोबाईल क्रमांक 9834416038 असा नंबर डाईल करुन त्यावर 15:11 वा. मिस्ड कॉल दिला व माझा मोबाईल परत दिला. त्यावर मी हे..कसं करु..आज का.. असे विचारले असता त्यांनी तुला कीती वेळा सांगितलय..चर्चा करु नको रे.. करायच असल तर कर नाही तर जा.. असे सांगितले. तेव्हा मी ठिकाय मी येतो.. ठिकाय मी येतो.. येतो की जावुन..हिथ तर गाडी पलीकड लावलीय सर..ही तीन रुम नाही त्या का पलीकडच्या तीथ गाडी लावलीय.. असे सांगून शेटे यांचे कार्यालयातून बाहेर येवून पंच क्र. 1 यांना घेवून माझे चारचाकी गाडीतून ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे परत आलो अशी हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे गळयातून काढून घेतलेला व्हाईस रेकॉर्डर आमचेकडील संगणकाला लावून झालेले संभाषण ऐकले असता सदरचे संभाषण आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र. 01 बांबळे व तक्रारदार यांनी वर सांगीतले प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारी वरून तक्रारदार यांना लोकसेवक शेटे यांचेकडे दि. 25/11/2025 रोजी पडताळणी कामी पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे वडील लक्ष्मण जयराम माळी यांचे नांवे आपले सरकार पोर्टलवर महाराष्ट्र शासन कृषी विभाग महाडिबीटी पध्दतीव्दारे राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने मधून कृषी अवजारे साहित्य मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यावरुन लॉटरीपध्दतीने निवड झालेली होती. त्यानंतर साहित्य मिळण्यासाठी आवश्यक असणारे ऑनलाईन पध्दतीव्दारे पुर्वसंमती देणेकरीता लोकसेवक शेटे यांनी सुरवातीला 10,000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 8,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी येतो की जावुन..हिथ तर गाडी पलीकड लावलीय सर असे सांगितलेले होते. त्यानंतर तक्रारदार श्री. माळी व त्यानंतर पंच क्र. 1 श्री. बांबळे पंच क्र. 02 श्री. डाके यांचे सापळापुर्व निवेदन घेतले ती वेळ 18:18 वा. ची होती. सदरचे निवेदन घेताना त्याचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेत आलेले आहे. पडताळणी व सापळापूर्व कारवाईदरम्यान कार्यालयीन वेळ संपुन गेलेने लोकसेवक शेटे हे कार्यालयात आहेत अगर कसे याबाबत खात्री करून सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरवून लोकसेवक शेटे यांचे मोबाईल नं. 9834416038 वर तक्रारदार यांचा मोबाईल नंबर 8007050157 यावरून दोन वेळा फोन कॉल केला असता शेटे यांनी ते कट केलेने त्यांचेशी संपर्क झाला नसलेने दि. 26/11/2025 रोजी लोकसेवक शेटे यांचे कार्यालयातच समक्ष सापळा कारवाई करणचे सर्वानुमते ठरवून तक्रारदार व पंच यांना सर्व योग्य त्या सुचना देवून पुढील कार्यवाही तूर्त स्थगित केली. त्यानंतर झाले पडताळणी कारवाईचा सविस्तर पंचनामा ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालय येथे करणेत आलेला आहे.

त्यानंतर दि. 26/11/2025 रोजी 11:30 वा. आम्ही कार्यालयात उपस्थित असताना दि. 25/11/2025 रोजीचे पडताळणी कारवाईतील तक्रारदार माळी व दोन्ही पंच उपस्थित झाले. त्यानंतर आम्ही

लोकसेवक शेटे यांचेविरूध्द सापळा कारवाई करणेचे अनुषंगाने पोनि/ लांभांते, पोहेकॉ/ 1749 घुगे, पोहेकॉ/ 571 मुल्ला, पोहेकॉ/1616 जाधव, पोना/30 नरोटे, पोकॉ/862 पवार, चापोशि/2026 श्रीराम यांना आमचे दालनात बोलावून त्यांची व तक्रारदार माळी व दोन्ही शासकीय पंच यांची आपसात पुन्हा एकदा ओळख करून दिली. व तक्रारदार माळी यांनी दिलेले तक्रारीवरून लोकसेवक शेटे तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांची पडताळणी केली असता त्यांनी प्रथम 10,000/- रू ची मागणी करून तडजोडीअंती 8,000/- रू लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार माळी तसेच सापळा पथकास सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरू करण्यात येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेनुसार तक्रारदार माळी यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लोकसेवक शेटे यांना देणेसाठी म्हणून 500/- रू दराच्या 16 चलनी नोटा एकूण रक्कम 8,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोना/जाधव यांनी नमुद नोटांचे नंबर कार्यालयातील संगणकावर टाईप करून घेवून त्याची प्रिन्ट काढली व त्यावर मी व पंचांनी सहया करून तो कागद सापळा कारवाईत जप्त रक्कमेशी पडताळणी करणेसाठी पंच क्र. 2 डाके यांचेकडे सुरक्षित ठेवला. त्यानंतर आम्ही तक्रारदारास व पंचांना अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समाजावून सांगून त्याबाबतचे प्रात्यक्षिक कार्यालयात कृत्रीम अंधार करुन दाखिवले. त्यानंतर सदरच्या चलनी नोटा पोना/30 नरोटे यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, पोना/30 नरोटे यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर त्यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार माळी यांच्या नेसणीस असलेल्या शर्टाच्या वरील डाव्याबाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर पोहेकॉ नरोटे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावलेली असलेने त्यांना सापळा पथकातून वगळण्यात येत असलेचे सर्वानुमते ठरवून त्यांना कार्यालयात थांबण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही पंचांना, तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या.
त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची “अंगझडती व लाचेची रक्कम” जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोहेकॉ/ 571 मुल्ला हे त्यांचेकडील मोबाईलमध्ये करणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही आमचेकडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे पाकिटातून बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार माळी व दोन्ही पंचाचे निवेदने सदरचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनिमुद्रीत करून घेतले ती वेळ 12:21 वा ची होती. सदरचे निवेदन घेताना त्याचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेत आलेले आहे.

त्यानंतर लोकसेवक शेटे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार माळी यांना व्हॉईस रेकॉर्डर 12:43 वा. चालू करुन त्याचे शर्टाच्या आत असलेल्या बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून शासकिय पंच क्र.1 श्री. बांबळे यांचेसह तक्रारदार यांचेकडील टाटा पंच चारचाकी वाहन क्र. नं. एम.एच. 12 व्ही.व्ही. 4442 या मधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी.

4098 या मधून रवाना झालो. तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र. 02 तसेच सापळा पथक वाहनातून उतरून कार्यालयाच्या जवळ कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो. तक्रारदार व पंच क्र. 01 हे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर या कार्यालयात गेले. त्यानंतर काही वेळाने पंच नं. 01 बांबळे यांना दिलेले सुचनेप्रमाणे त्यांनी त्यांचा मोबाईल नं. 8605942363 यावरून आमचा मोबाईल नं. 9657917317 यावर 13:53 वा. फोन करून लाच रक्कम स्विकारलेचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी आम्ही व सापळा पथक तक्रारदार व लोकसेवक शेटे यांचे कार्यालयात जावून त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही लोकसेवक शेटे यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली. त्याचवेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईसरेकॉर्डर काढून बंद केला ती वेळी 13:54 वा. ची होती.

त्यानंतर पोह/मुल्ला यांनी त्यांचे मोबाईलवरून सदर घटनेचे व्हिडीओ रेकॉर्डीग सुरू केले. त्यानंतर आम्ही लोकसेवक शेटे यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव धनंजय सुभाष शेटे वय- 31 वर्षे रा. गौरी गणेश नगर, भाजी मंडई जवळ, (श्री. गं‌ुड यांचे घरी भाडयाने) बाळे, ता. उत्तर सोलापूर मुळ रा. खेड, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर असे असल्याचे सांगून ते तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर येथे तालुका कृषी अधिकारी या पदावर कर्तव्यास असल्याचे सांगीतले.

त्यानंतर आम्ही आरोपी लोकसवेक शेटे यांना लाच रक्कम कुठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी त्याबाबत उडवाउडवीची उत्तरे दिलेने पंच नं. 1 यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरची लाच रक्कम आलोसे शेटे यांनी त्यांच्या समोरील टेबलवर सरकवलेले कागदामध्ये ठेवण्यास सांगितलेने ती त्याचेसमोरील टेबलवरील कागदात ठेवलेली आहे असे सांगितले. त्यानंतर पोनि/ लांभाते यांनी सदर टेबलवरील दुमडून ठेवलेला कागद उघडला असता त्यामध्ये लाच रक्कम मिळून आली. त्यानंतर सदर शेटे यांचे कॅबिनमधील लाईट बंद करून त्या अंधारात आलोसे शेटे यांनी स्विकार केलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर लोकसेवकाचे कॅबिनमधील टेबलवर मिळून आलेल्या नोटांचे क्रमांकाची पंच नं. 2 यांचे करवी तपासणी केली असता त्या तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाशी तंतोतंत जुळून आल्या. त्यानंतर आरोपी लोकसेवक शेटे यांना शासकिय वाहनातून लाप्रवि कार्यालय सोलापूर येथे आणण्यात आले.

त्यानंतर पंच क्र. 01 श्री. बांबळे यांना सापळा कारवाईदरम्यान लाचेची रक्कम आलोसे शेटे यांना देण्यासाठी गेल्यानंतर काय घडले हे आमच्या समक्ष पंच क्र. 02 यांना सांगा असे म्हणालो असता पंच क्र. 1. श्री. बांबळे यांनी सांगीतले की,

“मी व तक्रारदार श्री. माळी असे त्यांचे चारचाकी वाहनामधून लाचलूचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातून निघून वाहनातून सिव्हील चौक, कालिका मंदीर, जोड बसवण्णा चौक, दयानंद कॉलेज मार्गे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर येथे गेलो. तेथे चारचाकी वाहन पार्किंगमध्ये लावून मी व तक्रारदार माळी असे तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उत्तर सोलापूर कार्यालयात गेलो असता तेथे शेटे यांचेसमोर बरेच लोकांची गर्दी असलेने आम्ही तेथेच कार्याल्यात थांबबून राहीलो. काही वेळाने तक्रारदार यांनी एका व्यक्तीस सरांना भेटावयाचे असल्याचे सांगितले. तेव्हा समोरील

व्यक्तीने कार्यालयामध्ये मोठे साहेब आले असुन मिटींग असल्याचे सांगितले. त्यामुळे आम्ही दोघेही तेथेच बसुन राहीलो. काही वेळाने शेटे यांचेसमोरील गर्दी कमी झालेनंतर मी व तक्रारदार माळी असे त्यांचे कॅबिनमध्ये जावून भेट घेतली असता त्यावेळी तक्रारदार माळी यांनी झालय का सर... असे म्हणून त्यांचे कामाचे अनुषंगाने चर्चा केली त्यावेळी काल सर सव्वा सहाच्या दरम्यान मी फोन केला होता. उचलला नाही. असे म्हणाले असता शेटे यांनी हे असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी दोन वेळा केलता, जाता-जाता भेटाव म्हणुन तुम्हाला ही केला होता. त्यावरही शेटे यांनी हं असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांनी आणलेत दिव का? असे विचारले असता शेटे यांनी काय असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी आठ हजार.. असे म्हणाले त्यावर शेटे यांनी हं. असे म्हणून त्यांचे समोरील एक कागद तक्रारदार यांचेकडे सरकावून सदरची लाच रक्कम त्या कागदामध्ये ठेवण्याचा हाताने इशारा केला त्याप्रमाणे तक्रारदार यांनी सदरची रक्कम 8,000/- रू त्यांचे शर्टाचे खिशातून काढून, सर आठ हजार रुपये घेवुन आलोय.. ही बघा कितीयत आता, मोजुन घ्यायचे असतील तर मोजुन घ्या... असे म्हणून त्या कागदामध्ये ठेवली. व तक्रारदार माळी, मी तसेच शेटे असे सर्वजण बोलत बोलतच शेटे यांचे केबीनचे बाहेर आलो. त्यादरम्यान तक्रारदार हे शेटे यांचेशी बोलत असलेने मी मला दिलेले सुचनेप्रमाणे पोनि पवार यांचे मोबाईलवर फोन करून लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर त्यावेळी आपण व सापळा पथकाने शेटे यांना पकडले. त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांनी सुध्दा पंच क्र. 1 बांबळे यांचे सांगणे प्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर सदर बाबत झाले सापळा कारवाई चा सविस्तर पंचनामा ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे करण्यात आलेला आहे.

तरी दि. 25/11/2025 रोजी तक्रारदार श्री. सुजित लक्ष्मण माळी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 25/11/2025 रोजी 12:45 वा. पासून 15:30 वा. चे दरम्यान पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी त्यांचे वडील लक्ष्मण जयराम माळी यांचे नांवे आपले सरकार पोर्टलवर महाराष्ट्र शासन कृषी विभाग महाडिबीटी पध्दतीव्दारे राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने मधून कृषी अवजारे साहित्य मिळण्यासाठी ऑनलाईन केलेल्या अर्जाची लॉटरी पध्दतीने निवड झालेली होती. सदरचे साहित्य मिळण्यासाठी आवश्यक असणारे ऑनलाईन पध्दतीव्दारे पुर्वसंमती देणेकरीता आरोपी लोकसेवक श्री. धनंजय सुभाष शेटे, तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर यांनी तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर येथील त्यांचे कार्यालयात सुरवातीस 10,000/- रू व तडजोडीअंती 8,000/- रू लाचेची मागणी करून ती रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष दिनांक 26/11/2025 रोजी 12:43 वा ते 13:54 वा. चे दरम्यान तालुका कृषी अधिकारी, उत्तर सोलापूर येथील त्यांचे कार्यालयात स्वत: स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला आहे म्हणून माझी आरोपी लोकसेवक धनंजय सुभाष शेटे पद तालुका कृषी अधिकारी, नेम. तालुका कृषी अधिकारी कार्यालय उत्तर सोलापूर हल्ली रा. गौरी गणेश नगर, भाजी मंडई जवळ, (श्री. गुंड यांचे घरी भाडयाने) बाळे, ता. उत्तर सोलापूर, रा. मुळ रा. खेड, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष सोलापूर

**13.** **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SURAJ GANI MULANI (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SURAJ GANI MULANI

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल या/पाहिलेल या) शारीरिक वैशिष टये, व यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व यंग वैशिष टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त यापेक्षा अधिक तपशील दिल यास फक त यातील रकान यांची नोंद घेतली जाईल)**